दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक १५५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • रविवार दि.२९ ऑगस्ट २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

## नवीमुंबई लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई

# एक लाखाच्या लाचेप्रकरणी पनवेलमधील दोन वनरक्षक गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**एक लाख रुपयाची लाच मागितल्या प्रकरणी नवी मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पनवेल येथील दोन वन रक्षकांवर कारवाई केल्याने वन खात्यामध्ये घबराटीचे वातावरण आहे.**

तक्रारदार याचे वडील व काका यांनी तालुक्यातील करंबेळी मोर्बे येथील दळी भाग जमिनीतून २९ गुंठे जागा वन विभाग महाराष्ट्र शासकीय योजनेनुसार शनिवार महादू सपरा यांचेकडून कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र करून घेतले. तक्रारदार यांनी करंबेळी गावातील दळी जमीन ही बाळू गडगे व पवन चौधरी यांना विकून दलाली केली. त्या जमिनीवर तारेचे कुंपण घालण्याकरिता तसेच जमिनीवरील असलेली झाडे तोडताना कोणतीही कारवाई न करण्याकरिता तीन व्यवहार खरेदीदारांकडून प्रत्येकी ४० हजार रुपये प्रमाणे असे एकूण १ लाख २० हजार रुपयाची मागणी केली. तडजोडी अंती एक लाख रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने त्या संदर्भातील तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नवी मुंबई येथे केल्यानंतर पर्यवेक्षण अधिकारी श्रीमती. ज्योती देशमुख यांच्या पथकाने पनवेल परिसरात सापळा रचून लाच स्वीकारणारे ज्ञानेश्वर गायकवाड (३६ पद वनरक्षक पनवेल रेंज) व माधुरी पाटील (२६ वन रक्षक संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन पनवेल) यांना ताब्यात घेवून त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून त्यांना न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. याबाबत अधिक तपास पोलीस निरीक्षक नितीन खैरनार करीत आहेत.

## संक्षिप्त...

### एनसीबीचा अरमान कोहलीच्या घरी छापा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यूनंतर सुरू झालेल्या नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या तपासाने अनेक अभिनेत्यांना आपल्या कचाट्यात घेतले आहे. आता शनिवारी एनसीबीने अभिनेता अरमान कोहलीच्या घरावर छापा टाकला आहे. याआधी एनसीबीने टीव्ही अभिनेता गौरव दीक्षितच्या घरातून अमली पदार्थांचा साठा जप्त केला होता. यानंतर गौरवला न्यायालयात हजर करण्यात आले. त्याला ३० ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोच्या (एनसीबी) अधिकाऱ्यांनी सांगितले की, अभिनेता अरमान कोहलीच्या मुंबईतील निवासस्थानी छापा टाकत आहे. त्याचबरोबर, असे सांगितले जात आहे की, ड्रग्ज पेडलरशी संबंध असल्याच्या आरोपावरून अरमान कोहलीच्या घरी हा छापा टाकण्यात आला आहे. खरं तर, शुक्रवारी रात्री पकडलेल्या एका अमली पदार्थ विक्रेत्याच्या चौकशीनंतर हा छापा टाकण्यात आला. अरमान कोहलीच्या मुंबईतील घरावर छापा टाकल्यानंतर एनसीबी टीम त्याला मुख्य कार्यालयात घेऊन गेली. मात्र, या छाप्यासंबंधीत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. असं म्हटलं जात आहे की छापेमारी पूर्ण झाल्यानंतरच एनसीबी यासंबंधी विस्तृत माहिती देईल.

## जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी घेतली बाळासाहेब थोरात यांची भेट

**दै.रायगड नगरी । उरण**

रायगड जिल्हा काँग्रेसच्या अध्यक्षपदी महेंद्र घरत यांची निवड जाहीर होताच त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरू झाला. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांनी निवड होताच राज्याचे महसूल मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष नसीम खान यांची सदिच्छा भेट घेतली.

जिल्हाध्यक्ष पदी महेंद्र घरत यांची निवड जाहीर झाल्या क्षणापासून त्यांचे अभिनंदन करण्यासाठी घरी चाहत्यांची गर्दी जमा झाली होती. अनेकांनी त्यांचे मोबाईल द्वारे अभिनंदन केले. महेंद्र घरत यांची जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याने मरगळ आलेल्या काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

राज्याचे महसूल मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष नसीम खान यांची सदिच्छा भेट घेतली. त्यावेळी त्यांनी महेंद्र घरत यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष यांनी रायगड जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाची ताकद वाढविण्या संदर्भात विचारविनिमय करून पुढील कार्यकरमाची रूपरेषा ठरविण्यात आली आहे. यावेळी महेंद्र घरत यांच्या बरोबर जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित होते.



## ... तर सन २०५० पर्यंत मुंबईतील भाग पाण्याखाली जाणार : इक्बाल चहल

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त इक्बाल चहल यांनी मुंबईकरांना अतिशय महत्वाचा, गंभीर इशारा दिला आहे. वातावरणात झपाट्याने बदल होत असून आपण जागरूक झालो नाही तर या बदलांमुळे समुद्रातील पाण्याच्या पातळीत वाढ होऊन सन २०५० पर्यंत मुंबईतील नरिमन पॉइंट, मंत्रालय परिसर, तसेच दक्षिण मुंबईतील ए, बी, सी आणि डी वॉर्डमधील तब्बल ८० टक्के भाग पाण्याखाली जाईल, अशी माहिती आयुक्त चहल यांनी दिला आहे.

पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत पर्यावरण आणि वातावरणीय बदल मंत्रालयातर्फे मुंबई वातावरणीय बदल ॲक्शन प्लॅन योजनेच्या वेबसाईटचे आज लाँचिंग करण्यात आले. त्यावेळी मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबाल सिंह चहल बोलत होते. जगभरात वातावरणात बदल होत असल्याचे दिसत आहे. त्याचा परिणाम मुंबईवर देखील होत आहे. हाच मुद्दा आयुक्त चहल यांनी या कार्यक्रमात उपस्थित करत गंभीर इशारा दिला. वातावरणीय बदलांमुळे समुद्राच्या पाण्याच्या पातळीत वाढ होऊन सन

.../४

## श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची पाठ ; व्यावसायिकांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

श्रीवर्धन तालुक्यात प्रामुख्याने पर्यटन व मच्छीमारी हे व्यवसाय चांगल्या प्रमाणात चालतात. मात्र कोरोना महामारी मुळे पर्यटन व्यावसायिकांचे पूर्णपणे कंबरडे मोडले आहे. मागील वर्षी म्हणजेच २०२० साली जवळजवळ आठ ते नऊ महिने व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते. तर या वर्षी देखील पाच महिने व्यवसाय पूर्णपणे बंद ठेवण्यात आला होता.

शासनाने निर्बंध हटवल्यानंतर पर्यटन व्यावसायिकांनी आपापल्या हॉटेलची दुरुस्तीची कामे करून घेऊन, हॉटेल व्यवसाय चालू करण्यासाठी सर्व प्रकारची लागणारी साधन सामुग्री त्याचप्रमाणे नोकरवर्ग यांना तयार करून ठेवले. परंतु एक ऑगस्ट पासून अजून पर्यंत एकाही शनिवारी, रविवारी सुद्धा पर्यटक या ठिकाणी आलेले नाहीत. पावसाळ्यात एक जून ते ३१ जुलै या काळामध्ये मासेमारी पूर्णपणे बंद असते. त्यामुळे हा व्यवसाय देखील बंद असल्यामुळे या व्यवसायांवर निगडित असणाऱ्या

.../४



## श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची पाठ ; व्यावसायिकांचे नुकसान

**दै.रायगड नगरी । उरण**

**इंधनाचे दिवसेंदिवस भाव वाढत असल्याने वाहतूक व्यवसाय करणारे व्यावसायिक मेटाकूटीला आले आहेत. त्यामुळे अनेक वाहन चालक, व्यावसायिक पर्यायी इंधनाचा वापर करत आहेत. उरण मध्ये अशा प्रकारे बायोडिझलच्या नावाखाली अनधिकृतपणे इंधन विक्रीचा व्यवसाय जोरात सुरू आहे. जेएनपीटी परिसरात अशाच प्रकारे बेकायदा बायोडिझेल विक्री करणाऱ्या एका लॉजिस्टीक कंपनीवर न्हावाशेवा पोलिसांनी धाड टाकून तब्बल २७ हजार ३०० लिटर बायोडिझेल जप्त करण्यात आले आहे.**

न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बायोडिझेल या बेकायदा विक्री वरील धंद्यावर केलेल्या कारवाईत १० लाख रूपये किंमतीची एक केबीन, १५ लाख ५३ हजार रूपये किंमतीचा एक टँकर, २ लाख रूपये किंमतीची लोखंडी टाकी, ७० हजार रूपये किंमतीची डिझेल भरण्याची मशिन, एक मोटार आणि १५ लाख ५० हजार रूपयांचे बोगस बायोडिझल अशी लाखो रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. या प्रकरणी न्हावा शेवा पोलिसांनी टँकर चालक मृत्यूंजय कुमार जयशंकर पांडे आणि संजय बाळूभाई मशरू यांना अटक केली आहे. तर हा अनधिकृत व्यवसाय करणारे टी.एल लॉजिस्टिकी कंपनीचे मालक दिलेश गोगरी यांच्यावर भादवि कलम आणि अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जेएनपीटीच्या अनुषंगाने या परिसरात वाहतूक व्यवसाय मोठ्या प्रमाणात सूरू असतो. रोज हजारो अवजड वाहने जेएनपीटीमध्ये

.../४

## फूड मॉल समोर परप्रांतीय नागरिकांचे अतिक्रमण

### अतिक्रमण हटवण्यात चालढकल



**दै.रायगड नगरी । रोहा**

मुंबई –गोवा महामार्गालगत कोलाड नजिक एका मराठी उद्योजकाने भव्यदिव्य असा फूड मॉलसह १११ सदनिकांचा प्रकल्प उभारण्यास सुरुवात केली आहे. परंतु महामार्गालगत असलेल्या मोकळ्या जागेत कोणतीही शासकीय परवानगी न घेता काही परप्रांतीय व्यावसायिकांनी कोरोना काळात बेकायदेशीर बांधकाम केले आहे. सदर अनधिकृत बांधकाम थांबविण्यासाठी मा. न्यायालयाचे १० जुलै २०२० रोजीचे आदेश असून देखील प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काही परप्रांतीय नागरिकांनी बेकायदेशीर बांधकाम पूर्ण केले आहे. यामुळे परप्रांतीयांच्या बेकायदेशीर बांधकामाला प्रशासनाची मूक संमती आहे का असा सवाल उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्याचे खासदार सुनिल तटकरे यांच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले होते. कोलाड जवळील वरसगाव येथील सर्व्हे क्रमांक ४४५ वर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. याबाबत तक्रारदार प्रशांत पिंगळे या मराठी उद्योजकाने पनवेल इंदापूर रस्त्याच्या भूसंपादनासाठी नियुक्त उपविभागीय अधिकारी पेण तसेच भारतीय मराठी राष्ट्रीय

.../४



# स्वागतार्ह दिलासा

करोनामुळे अनेक अकल्पनीय संकटे अचानक उभी ठाकली आहेत. घरातील कमावता हात गेल्यामुळे शेकडो कुटुंबे उघड्यावर आली आहेत. या परिस्थितीत आजवरच्या अनेक प्रथा, नियम बदलून नव्या वर्तमानाला सामोरे जाणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने आपल्या सेवेतील 'अ'; तसेच 'ब' वर्गातील अधिकाऱ्यांचा कामावर असताना अपमृत्यू झाल्यास, अनुकंपा तत्त्वावर घरातील सदस्यांना नोकरी देण्याचा जो निर्णय घेतला आहे, त्याकडे या दृष्टीने पाहायला हवे. महाराष्ट्रातील प्रशासनाचे 'अ', 'ब', 'क' आणि 'ड' असे चार वर्ग आहेत. यातील 'क' आणि 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांसाठी आजवर अनुकंपा तत्त्व लागू होते. सरकारी सेवेत असताना अचानक मृत्यू आला किंवा सेवा बजावत असताना कायमस्वरूपी अपंगत्व आले, तर या वर्गातील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला सरकारी सेवेत सामावून घेण्याचा नियम आहे. हा नियमही महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले, तेव्हा नव्हता. तो सेवाशर्तींमध्ये १९७६ मध्ये समाविष्ट करण्यात आला. या अनुकंपा तत्त्वावर मिळणाऱ्या नोकऱ्यांमध्ये तेव्हाही 'अ' आणि 'ब' वर्गातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला नव्हता. करोनाचे संकट अलीकडे आले असले, तरी एखादा 'अ' किंवा 'ब' वर्गश्रेणीतील अधिकारी अचानक मरण पावला किंवा अपंग झाल्यास त्याच्या कुटुंबातील व्यक्तीला सरकारी सेवेत सामावून घ्यावे, ही मागणी बऱ्याच काळापासून होत होती. करोनाच्या उद्रेकानंतर या मागणीचे गांभीर्य वाढले आणि आता राज्य सरकारने अनुकूल प्रतिसाद दिला आहे, ही समाधानाची बाब आहे. महाराष्ट्र सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने या महिन्याच्या सुरुवातीलाच हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर आणला होता. महाराष्ट्रातील सरकारी, निमसरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कर्मचारी असा सगळा आकडा मिळून वीस लाखांच्या आसपास असावा. करोनाचा उद्रेक झाल्यापासून हजारो राज्य सरकारी कर्मचारी आणि अधिकारी या संकटाचा सामना करीत आहेत. यात जसे 'क' आणि 'ड' वर्गातील कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला; त्याचप्रमाणे अनेक 'अ' आणि 'ब' वर्गातील अधिकाऱ्यांचा अपमृत्यू झाला होता. या मृत्यूंची दखल घेऊन राज्य सरकारने आपल्या नियमावलीत बदल करावेत, अशी मागणी राज्य कर्मचारी व अधिकारी संघटना करीत होत्या. त्यांची मागणी आता मान्य झाली आहे. 'अ' आणि 'ब' वर्गातील अधिकाऱ्यांचा या काळात अपमृत्यू झाला असल्यास, त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला जी सरकारी नोकरी मिळेल, ती मात्र 'क' किंवा 'ड' वर्गातील असेल. या निर्णयाची सरकारने वेगाने अंमलबजावणी करायला हवी. त्याचप्रमाणे, राज्यभरात सरकारी जागांमध्ये राहणाऱ्या अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा शासकीय सेवेत असताना मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकऱ्या देण्याबरोबरच, त्यांना त्या त्या जागांमध्ये राहू देण्याचीही गरज आहे. महाराष्ट्रातील आणखी अनेक विभागांतील कर्मचाऱ्यांना करोनाचा तडाखा बसला आहे. त्यातील एक पोलिस दल आहे आणि दुसरा एसटी कर्मचाऱ्यांचा वर्ग आहे. सरकारी आरोग्यसेवेतील कर्मचारी, डॉक्टर यांचाही करोनाच्या लढाईत मृत्यू झाला आहे. हे सर्व करोनायोद्धे आहेत. पोलिस दलातील शेकडो कर्मचाऱ्यांचा आजवर करोनाने मृत्यू झाला आहे. अनेक एसटी कर्मचाऱ्यांचाही मृत्यू ओढावला आहे. या कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याचा निर्णय सरकारने आधीच घेतला आहे; मात्र त्यांच्या कुटुंबांमधील कुणाला तरी कायमस्वरूपी नोकरीत घेण्याचीही आवश्यकता आहे. राज्य सरकारच्या या नव्या नियमांना अनुसरून 'अनुकंपा नियुक्ती नियमावली' नव्याने करावी लागणार आहे. तीही लवकरात लवकर अमलात यायला हवी. याचप्रमाणे, सगळ्या सरकारी यंत्रणेमधील जे कर्मचारी काटेकोर सेवाशर्तींनुसार सरकारी कर्मचारी ठरत नसतील, अशांकडेही राज्य सरकारने काहीशा अनुकंपेने पाहण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचे एक उदाहरण आशा सेविकांचे आहे. या सेविका सरकारी कर्मचारी नाहीत. त्यांना दर महिन्याला तुटपुंजे मानधन देण्यात येते. सरकारने काही काळापूर्वी त्यांना विशेष करोनाभत्ता देण्याचा निर्णय घेतला होता. हा दरमहा पाचशे रुपयांचा करोनाभत्ता अपुरा असून, तो राज्य सरकारने वाढविण्याची आवश्यकता आहे. आशा सेविकांचे दरमहाचे मानधन वाढविण्याचे सरकारने ठरविले असले, तरी ही रक्कम त्यांच्या हातात लवकरात लवकर पडायला हवी. राज्याच्या गृहमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वीच पोलिस दलातील रिक्त पदे वेगाने भरली जातील, असे म्हटले होते. अशी भरती झाल्यास जुन्या कर्मचाऱ्यांवरचा ताण कमी होईल आणि करोनाशी नव्या दमाने सामना करता येईल. सरकारी सेवा बजावत असताना मृत्यू झालेल्या सर्वच वर्गातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या कुटुंबात अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्याचा राज्य सरकारचा आदर्श राज्यातील खासगी उद्योगांनीही घ्यावा. तसा तो घेतला, तर कल्याणकारी राज्याचे एक पाऊल पुढे पडू शकेल.

# मुख्यमंत्री यांच्याकडून अभिनेत्री दिपाली सय्यद यांच्या विधायक व लोकोपयोगी कार्याचे कौतुक



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

कोरोना सारखी जैविक महामारी, निसर्ग चक्रीवादळ, तौक्ते वादळ, अतिवृष्टी, महापूर या संकट काळात शिवसेना नेत्या व प्रसिद्ध सिने अभिनेत्री दिपाली ताई भोसले सय्यद यांनी सामाजिक बांधिलकी जपत प्रेरणादायी व उल्लेखनीय काम केले. पक्षसंघटना मजबुती व बलाढ्य होणेकामी त्यांचे योगदान महत्वपूर्ण ठरत आहे. अभिनेत्री दीपालीताई सय्यद यांना शिवसेनेकडून लवकरच मोठी जबाबदारी देणार असल्याचे शिवसेना पक्ष प्रमुख तथा राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी सांगितले .

गेल्या अनेक वर्षा पासून सिने अभिनेत्री दिपाली ताई भोसले सय्यद यांच्या दिपाली भोसले सय्यद चॅरिटेबल च्या माध्यमातून अनेक सामाजिक व लोकोपयोगी विधायक उपक्रम राबविण्यात येत असल्याने व पूरग्रस्त भागाची पाहणी करून १०कोटी ची मदत केल्या बदल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे यांनी दिपाली ताई भोसले सय्यद यांचे कौतुक केले. तसेच राजकीय,सामाजिक

# करंजा गावात साथीचे आजार ; ग्रामस्थांमध्ये भितीचे वातावरण

**दै.रायगड नगरी । उरण**

करंजा गावात कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची लक्षणे ही राज्यातील, परराज्यातील व इतर गावातील खलाशी व व्यवसायासाठी आलेल्यांची गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. यावर वेळीच उपाययोजना केली नाहीतर पुन्हा एकदा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता ग्रामस्थांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले. तशा प्रकारचा मेसेज व्हाट्सएप ग्रुपवर व्हायरल झाला आहे.

दररोज बदलत्या ऊन पाऊस हवामानामुळे साथीच्या आजाराने डोके वर काढले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ताप, सर्दी, खोकला असा आजाराने अनेकांना ग्रासले आहे. करंजा गावातील सर्व दवाखान्यात उपचारासाठी गर्दी असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

यामध्ये प्रामुख्याने मासेमारी होड्यांवर खलाशी व तांडेल हे स्थानिकांपेक्षा कमी पगारात मिळत असल्याने जिल्हाबाहेरील व परराज्यातील व तसेच इतर व्यवसायासाठी येणाऱ्या लोकांचा मोठ्या प्रमाणात समावेश आहे. यांची कोणत्याही प्रकारची तपासणी केली जात नाही. त्यामुळे या साथीच्या आजाराचा फैलाव झाला असल्याचे बोलले जाते. तसेच गावात सोशल डिस्टंट न पाळणे व मास्कचा वापर न करणे असे चित्र नाक्यांनाक्यावर पहावयास मिळते. त्यामुळे ही भविष्य काळातील धोक्याची घंटा आहे. याकडे प्रशासनाने वेळीच लक्ष देऊन ठोस उपाययोजना केली नाहीतर पुन्हा एकदा कोरोनाच्या येणाऱ्या ३ ऱ्या लाटेचा फटका बसत पुन्हा एकदा गावात कोरोनाचा प्रादुर्भाव होऊन गाव सील करण्याची वेळ येण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. यावर प्रशासन काय उपाययोजना करते याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## पनवेल मनसेने दिला महावितरणला इशारा

# महावितरण कंपनी विरोधात नागरिकांमध्ये असंतोष

**ग्राहकांना पूर्वसूचना न देताच महावितरणचे कर्मचारी परस्पर मीटर काढण्याचे प्रकार**

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ग्राहकांना कोणत्याही पूर्वसूचना न देताच महावितरण कंपनीतील कर्मचारी परस्पर मीटर काढतात तर थकित लाईट बिल असल्यास कोणतीही कल्पना न देताच मीटर काढून घेऊन जाणे हे वारंवार घडत असल्याचा आरोप मनसेचे पनवेल तालुका चिटणीस सुजित सोनावणे यांनी केला आहे.

राज्यात कोरोनाच्या महामारीत गेली दोन वर्षे अनेकांच्या नोकरीवर गदा आली आहे. व्यापारी धंदेवाईक, हॉटेल व्यावसायिक यांच्यासह सर्वसामान्य नागरीकही आर्थिक मेळ बसविण्यात अक्षरशः मेटाकुटीला येऊन हतबल झाले आहेत. अशातच महावितरणकडून विजप्रवाह खंडीत करून मिटर काढण्याचा जोरदार सपाटा पनवेलमध्ये सुरू असल्याचे वीजग्राहकांककडून बोलले जात आहे. याबाबत अनेकांनी मनसे आदईगड जनसंपर्क कार्यालयमध्ये तक्रारी दिल्या होत्या. त्यानुसार शुक्रवारी सकाळी साडेअकरा वाजता पनवेल मनसेच्या शिष्टमंडळाने महावितरण कंपनीमध्ये जाऊन वरिष्ठ अभियंत्यांची भेट घेतली.



या दरम्यान वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदनही देण्यात आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याविषयी लक्ष घालून कर्मचाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात असे सांगून मनसेचे पनवेल तालुका चिटणीस सुजित सोनावणे यांनी वीज महावितरण कंपनीला इशारा दिला आहे. यापुढे असे प्रकार घडणार नाहीत असे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले आहे. यावेळी मनसे तालुका अध्यक्ष अविनाश पडवळ, तालुका चिटणीस सुजित सोनावने, आदई विभाग अध्यक्ष विलास भेरे, महाराष्ट्र सैनिक सुनील बनसोडे, सुरेश चवरे यांच्यासह आदी उपस्थिति होते.

# ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनच्या मागणीला राज्यपालकांकडून सकारात्मक प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियन यांच्या मागणीला राज्यपालकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून शिपिंग क्षेत्रातील आर्थिक फसवणुकीच्या ठोस उपायोजना करण्याच्या निवेदनाला राज्यपालांकडून पुढील कारवाईसाठी गृहमंत्र्यांकडे पाठविण्यात आले आहे.



काही दिवसापूर्वी ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनचे यावेळी अध्यक्ष संजय वासुदेव पवार, कार्याध्यक्ष अभिजीत दिलीप सांगळे आणि खजिनदार शितल शिवाजीराव मोरे आदींनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेवून शिपींग क्षेत्रात नोकरीचे आमिष दाखवून होत असलेल्या आर्थिक फसवणुकीबाबतची माहिती त्यांना देवून ही फसवणूक टाळण्यासाठी राज्य शासनाच्या मार्फत ठोस उपाय योजना होणे गरजेचे असल्याचे अध्यक्ष संजय पवार यांनी चर्चेमध्ये व तसेच निवेदन देताना मांडले होते.

या मागणीची दखल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी घेवून सदर मागणी संदर्भात महाराष्ट्राचे गृहमंत्री यांच्याकडे कारवाई करण्या संदर्भात पत्र पाठविले आहे.

त्यामुळे लवकरच अशा प्रकारच्या आर्थिक फसवणुकीला आळा बसेल असा ठाम विश्वास ऑल इंडिया सिफेरर्स अँड जनरल वर्कर्स युनियनच्या मार्फत वर्तविण्यात आला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## ... तर सन २०५० पर्यंत मुंबईतील भाग पाण्याखाली जाणार : इक्बाल चहल

२०५० पर्यंत मुंबईतील नरिमन पॉईंट, मंत्रालय, दक्षिण मुंबईतील ए, बी. सी आणि डी वार्डमधील ८० टक्के भाग पाण्याखाली जाईल, असे ते म्हणाले. निसर्ग आपल्याला वारंवार इशारे देत आहे. निसर्गाच्या इशाऱ्यानंतर आपल्याला जागरूक होण्याची आवश्यकता आहे. मात्र तरीही आपण जागरुक झालो नाही तर परिस्थिती धोकादायक होईल असे चहल म्हणाले. समुद्रातील पाण्याची पातळी वाढल्यानंतर याचा मोठा फटका दक्षिण मुंबईकील कफ परेड, नरीमन पॉईंट आमि मंत्रालय हा भाग ८० टक्के पाण्याखाली जाईल असे ते म्हणाले. ही स्थिती निर्माण होण्यासाठी फार काळ जावा लागणार नाही, तर फक्त २५ ते ३० वर्षांत ती स्थिती येणार आहे. याबाबत वेळीच विचार केला नाही तर परिस्थिती गंभीर होईल, असे चहल म्हणाले. मुंबई महानगर पालिकेने वातावरणीय बदलांबाबत ॲक्शन प्लॅन बनवण्यासाठी काम सुरू केले आहे. असे पाऊल उचलणारे मुंबई हे दक्षिण आशियातील पहिलेच शहर ठरले आहे. या प्लॅनअंतर्गत ज्या क्षेत्रांना धोका आहे, अशा क्षेत्रांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

## श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची पाठ ; व्यावसायिकांचे नुकसान

व्यावसायिकांचे देखील मोठ्या प्रमाणावरती हाल होत आहेत. ज्यामध्ये रायगड, रत्नागिरीमध्ये महापुर, त्याचप्रमाणे कोकणात वादळी पावसाचा इशारा अशा सातत्याने बातम्या देण्यात येत असल्याने त्याचा पर्यटन व्यवसायावरती गंभीर परिणाम होत आहे.कोकण म्हंटले की पाऊस जास्त पडतोच,पण येथे देखील लोक राहतात. अनेक पर्यटन व्यवसायिकांनी पर्यटन व्यवसाय करण्यासाठी बँकांकडून कर्ज देखील घेतली आहेत. मात्र ही कर्ज भरायची कशी असा यक्षप्रश्न पर्यटन व्यावसायिकांच्या समोर आहे. येत्या दहा बारा दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला आहे. सण साजरे करण्यासाठी देखील आता लोकांकडे पैसे नसल्याचे बोलले जात आहे. पर्यटक येत नसल्यामुळे श्रीवर्धन तालुक्यातील श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगर हे समुद्रकिनारे ओस पडल्याचे पाहायला मिळत आहे. तरी श्रीवर्धनच्या आमदार व रायगडच्या पालकमंत्री तसेच राज्याच्या पर्यटन राज्यमंत्री आदिती तटकरे यांनी पर्यटन व्यवसाय वाढीसाठी श्रीवर्धन वासीयांच्या पाठीशी उभे रहावे. अशी मागणी पर्यटन व्यावसायिकांकडून करण्यात येत आहे.

## श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची पाठ ; व्यावसायिकांचे नुकसान

माल घेवून येत असतात. सध्या इंधनाचे दर गगनाला भिडले असल्यामुळे वाहतूकीचा व्यवसाय करणे अवघड बनले आहे. त्यातच काहीनी जेएनपीटी परिसरात बायोडिझलच्या नावाखाली स्वस्त डिझेल देण्याचे अनधिकृत धंदे या परिसरात सरू केले असून जेएनपीटी परिसरातील पार्कींगच्या ठिकाणी हे धोकादायक व्यवसाय बिनादिक्कीतपणे सूरू आहेत. गुजरात किंवा बाहेरच्या राज्यातून हे बोगस इंधन येथे आणून विकले जाते.

जेएनपीटी परिसरात पकडलेला हा टँकर गुजरात मधून एडीबल ऑईल (गोडेतेल) च्या नावाने आणला होता. अशा प्रकारे रोज डझनभर टँकर या परिसरात येवून हे बोगस बायोडिझल विक्री करत असतात. काही दिवसांपूर्वी उरण पोलिसांनी देखिल अशा प्रकारच्या दोन कारवाया केल्या होत्या. न्हावा शेवा पोलिसांनी केलेली या कारवाई वरून किती मोठ्या प्रमाणात हा व्यवसाय सूरू असल्याचे सिद्ध होत आहे. या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर भटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी कर्मचारी हे अधिक तपास करत आहेत.

## फूड मॉल समोर परप्रांतीय नागरिकांचे अतिक्रमण

महामार्ग प्राधिकरण, जिल्हाधिकारी रायगड, उपविभागीय अधिकारी व तहसीलदार रोहा,सरपंच वरसगाव, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, खा सुनिल तटकरे या सर्वांच्या कडे सदर बेकायदेशीर बांधकाम काढून टाकण्यात यावे यासाठी अर्ज ,विनंती तसेच भेटी घेतल्या आहेत. मा.न्यायालयाने सदर बेकायदेशीर बांधकाम थांबविण्यासाठी आदेश दिलेले आहेत. उपविभागीय अधिकारी पेण यांनी सदर बांधकाम हटविण्यात यावे यासाठी मे सुप्रिम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा लि पाली यांना कळवून देखील सदर बेकायदेशीर बांधकाम हटविण्यात येत नसल्याने या अनधिकृत बांधकामाला वरदहस्त प्रशासनाचा का स्थानिक नेतृत्वाचा असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

परप्रांतीय नागरिक या ठिकाणी येऊन बेकायदेशीर बांधकाम करतात.आणि यामुळे स्थानिक मराठी माणसाची गळचेपी होत असेल तर असा विकास काय कामाचा अशी उद्विग्न प्रतिक्रिया व्यावसायिक पिंगळे यांनी दिली आहे. याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे देखील सांगण्यात आले आहे.

# जेएनपीटीच्या सीएसआर फंडाची खासगी संस्थांना कोट्यावधीच्या खिरापती

**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

जेएनपीटीच्या सीएसआर फंडाच्या कोट्यावधी रुपये रकमेची जेएनपीटी कडून मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली जात आहे.मागील पाच वर्षात स्थानिकांच्या मागणीनंतरही रायगड जिल्ह्यातील दोन संस्थांना देण्यात आलेला ५५ लाखांचा निधी वगळता जेएनपीटीने अन्य कोणताही खर्च केलेला नाही.मात्र उरण वगळता नागपुर ,पुणे, वर्धा, जालना येथील भाजप आणि आरएसएस सबंधित काही संस्थांना कोटयांवधी रुपयांच्या खिरापती वाटल्याची गंभीर बाब माहितीच्या अधिकारात उघडकीस आली आहे.

जेएनपीटी बंदराच्या १९८९साली उभारणी झाल्यापासूनच कमी अधिक प्रमाणात सीएसआर फंड वापरण्यास सुरुवात झाली आहे.बंदराच्या एकूण वार्षीक नफ्यातून दोन टक्के रक्कम सीएसआर फंडात जमा होते. या सीएसआरच्या रिझर्व फंडातूनच सामाजिक कामांसाठी निधी वाटप करण्यात येत असल्याचे जेएनपीटी अधिकार्यांकडून सांगण्यात येत आहे.मात्र सीएसआर फंडाचा निधी वाटपामध्ये राजकारण केले जात असल्याचा गंभीर आरोप येथील राजकीय पुढाऱ्यांकडून सातत्याने केला जात आहे.

नितीन गडकरी केंद्रीय नौकानयन मंत्रीपदाचा भार सांभाळत असताना यांच्या २०१६ ते २०१९ या दरम्यानच्या काळात रायगड जिल्ह्याबाहेरच सर्वाधिक ५० कोटींहून अधिक निधी वाटप करण्यात आला आहे.यामध्ये भाजप आणि आरएसएस प्रणीत खासगी सामाजिक संस्थांनाही कोट्यावधीं रुपयांच्या खिरापती वाटण्यात आल्या आहेत.यामध्ये बाबासाहेब पुरंदरे यांच्या शिवसृष्टी (छत्रपती ) प्रतिष्ठानसाठी पाच कोटी,नागपुर येथील माधव नेत्रालय आय इनस्टीट्युट अॅण्ड रिचर्स सेंटरसाठी पाच कोटी,श्री भवानी माता सेवा समितीला पाच कोटी तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान–औरंगाबाद या संस्थेला पाच कोटी,हनुमान क्रीडा प्रसारक वा बहुउद्देशीय मंडळ– पाच लाख, गुलशन फाऊंडेशन–१० लाख ८० हजार,वनवासी कल्याण आश्रम महाराष्ट्र दिड कोटी,शुश्रुषा सिटिझन को–ऑप हॉस्पीटल लिमिटेड एक कोटी,सर्च–नागपुर पाच कोटी आणि इतर काही खासगी संस्थांनाही कोट्यांवधीचा निधीं वाटप केला गेला असल्याची बाब माहितीच्या अधिकारातून उघडकीस आली आहे.

केंद्रात नव्याने नौकानयन मंत्रीपदाचा भार सांभाळलेल्या मनसुख मांडवीयानंतरही एप्रिल २०२० ते मार्च २०२१ दरम्यानही पीएम केअरफंडासाठी १६ कोटी ४० लाख, सद्भावना ग्रामीण विकास संस्था– ८० लाख, नागपूर गुजराती मंडळ – १९.७४ लाख, डॉ.श्याम प्रसाद मुखर्जी सार्वजनिक वाचनालय चंद्रपूर–१९.६१ लाख, राष्ट्रसंत तुकडोजी रिजनल कॅन्सर हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर ४० लाख,शिवीर सामाजिक विकास संशोधन सेवा संस्था कोल्हापूर–१० लाख, डॉ.दळवी मेमोरियल हॉस्पिटल अॅण्ड रिसर्च सेंटर नागपूर–२० लाख,सुहित जीवन ट्रस्ट रायगड –३५.०३ लाख,जन. शिक्षण संस्थान रायगड–२० लाख यांना सीएसआर फंडाचा निधी देण्यात आला आहे. तसेच रायगड जिल्हा वगळता २०१६ ते २०१९ या दरम्यान राज्यातील नंदुरबार, उस्मानाबाद, वासिम, जालना, यवतमाळ, सोलापूर, औरंगाबाद, पुणे, लातूर, वर्धा, अमरावती, जळगाव, नाशिक आदी जिल्ह्यांत सुमारे १५ कोटी निधींचा वाटप करण्यात आला आहे.

जेएनपीटी बंदर ज्या शेतकरी,भुमीपुत्र आणि प्रकल्पग्रस्तांच्या त्यागावर उभे राहिले आहे.त्या उरणकरांसाठी जेएनपीटी कोणत्याही प्रकारचा खर्च करण्यास तयार नाही.उरणकरांना अद्यावत इस्पितळ उभारणीसाठी, साडेबारा टक्के भुखंड विकसीत करण्यासाठी, जेएनपीटी हद्दीतील १८ ग्रामपंचायतींना मालमत्ता कर भरण्यासाठी आणि इतर विकासाची कामे करण्यासाठी आवश्यक निधी मिळावा यासाठी स्थानिक सामाजिक संस्था,राजकीय पक्षांनी जेएनपीटीकडे अनेकदा मागणी केली आहे.मात्र जेएनपीटीचा सीएसआर फंडाच्या कोट्यावधी रुपयांच्या निधींचे वाटप उरणकर भुमीपुत्रांना डावळून अन्य जिल्हयात केले जात आहे. मात्र डबघाईला आलेल्या आणि तोट्यात चालणाऱ्या कंपन्या, प्रकल्प खरेदी करण्यासाठी जेएनपीटीने पायघड्या टाकण्यासाठी पुढाकार घेत आहे. जेएनपीटीच्या या गळथान, अनागोंदी आणि गैरव्यवहाराबाबत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्याकडे लेखी तक्रार करुन चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. तसेच जेएनपीटीच्या सीएसआर फंडाच्या अनियमित निधी वाटपाची तक्रार करुन व्हिजिलन्स विभागाकडून चौकशी करण्याची मागणीही विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांनी याआधीच केली आहे.

याप्रकरणी जेएनपीटी प्रशासनाचे वरिष्ठ व्यवस्थापक एन.के. कुलकर्णी यांनी असमर्थता व्यक्त करत माहिती देण्यास स्पष्टपणे नकार दिला.माहिती हवी असल्यास माहितीच्या अधिकाराखाली मिळवावी अशी सूचनाही केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पनवेल तालुक्यातून २२ वर्षीय तरुणी बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानातून चहापत्ती घेऊन येते असे सांगून घरातून निघून गेलेली बावीस वर्षीय प्रीती रामभाऊ ठाकूर (राहणार पाले खुर्द, देवीचा पाडा) ही तरुणी हरवली असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

तिची उंची पाच फूट, पाच इंच, रंग सावळा, चेहरा उभट आहे. ती अंगाने सडपातळ असून अंगात पंजाबी ड्रेस घातलेला आहे.

तिने नाकात चमकी आणि उजव्या हातामध्ये मरून रंगाचा धागा बांधलेला आहे. तिला मराठी आणि हिंदी भाषा बोलता येते. या तरुणीबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक बीपी अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा.

## पनवेल शहरात अनोळखी इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल येथील दीपा बार समोरील ब्रिज खाली ५५ ते ६० वर्षीय इसमाचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांना सापडून आला आहे. पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत.

या इसमाची उंची पाच फूट, पाच इंच असून तो अंगाने मजबूत आणि डोक्याचे केस काळे– पांढरे वाढलेले आहेत. त्याने अंगात निळसर रंगाचा लाइनिंग असलेला हाफ शर्ट व त्याच्या आत राखाडी रंगाची हाफ शर्ट व निळसर रंगाची जीन्स पॅन्ट घातलेली आहे.

या इस्मा बाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी पोलीस नाईक सचिन म्हात्रे यांच्याशी संपर्क साधावा.

# टॉकीज..... ( रतन टॉकीज)

आज एका जुन्या परिचितांनी एक कुरिअर आमच्या मूळ घरच्या पत्यावर पाठवले, खरेतर ती जागा सोडून आता मला १६ वर्ष उलटून गेली आहेत.. पण जुने घर आजून ही तिथे आहे... तर त्या कुरिअर च्या पाकिटावर पत्या साठी लँड मार्क लिहिला होता रतन टॉकीज जवळ ते शब्द वाचले आणि मन एकदम भुतकाळात शिरले...

रतन टॉकीज अशी रचना करून साध–ारणपणे आपण ज्याला निऑन साइन म्हणतो तसं नाव रतन टॉकीज बसवलेले होत टिळक रोड पनवेल ला भर सदाशिव पेठेत हे टॉकीज ( ब्राह्मणी वस्तीतले) आज एक खंडर आणि पडीक जागा म्हणून उरलं आहे एक काळ होता जेव्हा रतन टॉकीज हे फक्त एका थिएटर चे नाव नसून आमच्या एरियाचा पत्ताच रतन टॉकीज होता... असे ऐकिवात आहे की हे मूळचे गोपालकृष्ण नाट्य मंदीर याचे मूळ मालक पनवेल मधील विख्यात बापट कुटुंब होते.. स्वातंत्र्य पूर्व काळातच ते रतन शेट बाठिया यांचे मालकीचे झालं..

घरापासून हाकेच्या अंतरावरच टॉकीज माज्या आठवणीत खरंतर रतन टॉकीज चा तसा पडता काळ आहे पण तरी देखील Most happening place होती ती त्या काळातील.. शाळेत जायचा यायचा रस्ता तोच.. रस्त्याच्या एका बाजूला हिरव्या रंगाची आणि काही ठिकाणी चॉकलेटी रंगाची कड असलेली टॉकीज ची इमारत र त न अशी अक्षरं मध्यभागी लावलेली .त्यावर वीज खेचून घेऊ शकणारा लोखंडी त्रिशूळ.. अर्धवर्तुळाकृती असे दोन बाजूने बाल्कनी कडे जाणारे लाकडी जिने .. जिन्या भोवती च्या भिंती वर काचेच्या शोकेस मध्ये लावलेली सिनेमाची पोस्टर्स.. टॉकीजच्या रस्त्यालगतच्या कंपाउंड वॉल वर लावलेली मोठी सिनेमा पोस्टर्स .. जायला यायला दोन स्वतंत्र गेट्स मध्यभागी रस्त्याकडे खिडकी असलेलं ( लोखंडी घडीव जाळी असलेले) बॉक्स ऑफिस ... डाव्या हाताला दुसरे एक तिकीट घर त्याला जोडून टॉकीज मॅनेजर ची खोली ....

माझ्या आठवणीत तेव्हा तिथे एक साठी ओलांडलेले थोडे स्थूल टक्कल पडलेले आणि पनवेल मध्ये (एकमेव) सस्पेंडर लावणारे एक ख्रिस्ती गृहस्थ होते नाव होतं थॉमस म्हातारबाबा तसे करड्या शिस्तीचे होते आणि स्टाफ वर त्यांची जरब पण होती.. उजव्या बाजूला टॉकीज ला चिकटून एक हॉटेल होता न्यू आनंद भुवन पण अखिल सदाशिव पेठ त्याला रामाशेटच हॉटेल म्हणून ओळखीत..त्याच्यात भिंतीत एक पानपट्टी कोरलेली होती..तिथे सिनेमाच्या गाण्याची पुस्तकं मिळायची...

प्रेक्षक सिनेमा सुरू होण्या अगोदर रामा शेट ना ५० पैसे देऊन चहाचे कुंपन घेऊन ठेवत, आणि मध्यन्तरात कुपन घेऊन पांढरी लुंगी अर्धी करून वर बांधलेली पांढरा शर्ट ,आणि पांढरे केस असलेले रामशेठ लोकांना चहा देत, तो प्यायला ही झुंबड उडत असे..

टॉकीज च्या मध्यंतर आणि सिनेमा सुरू झाल्याचे कर–––र वाजणाऱ्या बेल अगदी खणखणीतपणे रस्त्यावर ऐकू यायच्या मग रस्त्याच्या दुसर्या बाजूला उभ्या राहणाऱ्या सरबत वाले, शेगांवाले, वडापाव वाले याचा गिऱ्हाइका न साठी आरडाओरडा चालू व्हायचा , हे वडापाव रे.. शिंग गरर्म ,सोडा लेमन...

खरंतर हे सगळे हातगाडी वाले आमच्या बहुतेक कुटुंबाच्या ओळखीचे झालेले.. तो काळ ही तसा होता भरवस्तीत ल हे टॉकीज इथे घरंदाज मुलींबळी सहज ९ ते १२ च्या शो ला पण जायच्या.. आणि पालक ही जाऊ दयायचे.. हे विशेष त्यात या हातगाडी वाल्याचा सुद्धा प्रसंगी आधार वाटायचा..

टॉकीज समोर एक बी मोहन बिडी शॉप होत.. पानपट्टी चे दुकान पण आकाराने मोठं.. त्यात एक जुनाट गंज लागलेला कोकाकोला चा एक वर नाव कोरलेला पत्र्याचा आईस बॉक्स असायचा गोटी सोड्या च्या कालबाह्य झालेल्या काही बाटल्या ही तिथे धूळ खात पडलेल्या दिसायच्या.. टॉकीज शी जोडलेली गेलेली काही व्यक्तिमत्व होती, त्यानंच आयुष्यच टॉकीज बरोबर संपलं असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही..

मॅनेजर थॉमस बुकिंग क्लार्क तुपे, दत्ताकाका पेंडसे, प्रभाकर ज्याला बघून आम्ही लहान मूल घाबरायचो असा काळा, लाल डोळ्यांचा जाडजूड, बांठियान चा माणूस .... असाच एक ऑपरेटर गोडाम्बे रस्त्यावर वडापावची गाडी लावणारे जगे भुईमुगाच्या शेंगा विकणारे आंबवणे साखरे मामा, कुल्फीवाला पांडू, सोन्या सरबत वाला आणि त्यांच्या पत्नी सुशीला बाई, सुशीला बाई न चा पण एक दरारा त्या बलुतेदारात होता.. त्यांची दोन मूल पण पुढे सरबता ची गाडी लावत असत.. (दुर्दैवानं पुढे त्यांचा अंत झाला) टॉकीजला साजेश्या अनेक गोष्टी तिथे होत्याच, चित्रपट शौकीना नी पान खाऊन टाकलेले मांगल्याचे ? सडे होते शेंगांच्या टरफलाचा सडा होता.. सिगरेट बिडी ची थोटकं होती तरी देखील ते टॉकीज म्हणून अनेक बाबतीत खूप उजवे होते.. ड्रेस सर्कल च्या दोन रांगा.. महिला प्रेक्षकांच्या साठी राखीव असतं तिथे महिलांची टिंगलटवाळी करायची हिम्मत नव्हती कोणाची, अगदी डोअर किपर ची सुद्धा अश्या बाबतीत जरब होती हे विशेष.. बाहेर सरबतवाल्या सुशीला बाई न ची पण याबाबतीत नजर करडी होती... मूळचे नाट्यगृह असल्याने या टॉकीज चे acoustic खूप च चांगले होते असे जाणकार सांगतात.. इथे लागलेल्या सिनेमा ची जाहिरात पण त्याकाळी सिनेमाची पोस्टर जोडलेली हातगाडी फिरवून आणि हँडबील वाटून केली जात असे.. त्या हातगाडी पुढे एक ताशावाला ताशा वाजवत लोकांचे लक्ष वेधून घेत असे.. मॅनेजर थॉमस तर असे की डोअर किपर ला टॉर्च करता दिलेल्या सेलचा हिशोब आणि तारीख सुद्धा लिहिलेली असे..( सेल वर टाचणी ने खूण करून)

एक दोन वेळा अश्या ही मला आठवत आहेत की चित्रपटाला उदंड गर्दी (बाल शिवाजी किव्हा..गांधी..) तिकिटेच मिळेनात ,मग शेवटी रेव्हीन्यू खात्यात नोकरी करणाऱ्या माझ्या आई ने तिकिटे मिळावीत म्हणुन थॉमस ना देण्या साठी मला एक चिठ्ठी लिहून दिली.. तर कधी बांठिया इलेक्त्रिक कंपनी काम करणारे माझे काकांच सोबत आल्याने तिकिटाची रांग हा प्रश्नच उरला नाही (त्या काळी सिनेमाची तिकिटे आधी रेव्हीन्यू वशीला टॅक्सचा स्टॅम्प मारायला जात असत)..

एक भयंकर प्रकार त्या वयात तिथे पाहिला (ज्याचा टॉकीज शी काही संबंध नव्हता) टॉकीज समोर भर दिवसा झालेला खून.. होय खून..सरबतच्या गाडीवरचा बर्फ फोडायचा टोच्या पोटात खुपसून एका माणसाचा खून झाला होता आणि तो रक्ताच्या थारोळ्यात पडला होता... पुढे बांठिया घरातील भाऊबंदकीत टॉकीज हेलकावे खाऊ लागलं सरकारचा कर थकला आणि शेवटी रतन टॉकीज बंद पडल साधारणपणे.. १९८६/८७ साल असावे .. मग एक दिवस बातमी आली की मॅनेजर थॉमस नी गळफास लावून आत्महत्या केली (बहुदा काही टॉकीज व्यवहाराचे ताण असावेत) पण टॉकीज बंद झालं आणि त्यावर अवलंबून अनेक बलुतेदार देखील पोटाची खळगी भरायला विखुरले.. आणि आमच्या टिळक रोड ची ओळख असलेले रतन टॉकीज काळाच्या ओघात अस्तंगत झालं

**मिलिंद गांगल, पनवेल**
**९३२०२२६०७२**

## गोविंद ओमासे तळ्याचे नवे पोलीस निरिक्षक

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पोलीस ठाण्याचे निरिक्षक गेंगजे यांची बदली झाल्यानंतर पोलीस ठाण्याचा कार्यभार पोलीस निरिक्षक गोविंद ओमासे यांनी स्विकारला आहे. ओमासे यांची नियुक्ती झाल्यानंतर तळा प्रेस क्लबच्या वतीने ओमले यांचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी प्रेस क्लब अध्यक्ष संजय रिकामे, पत्रकार.पु.गो.मुळे, किशोर पितळे, संध्या पिंगळे, श्रीकांत नांदगावकर, नझीर पठाण आदि मान्यवर उपस्थित होते.



यापुर्वी ओमासे यांनी डहाणु आणि नगर येथे पोलीस निरिक्षक म्हणुन जवाबदारी पार पाडली आहे. तळ्यासारख्या निर्सगरम्य दुर्गम शांत आणि गुन्हेगारी प्रवृत्ती कमी असलेल्या भागात त्यांची बदली झाली आहे. तळा तालुक्यातील शांतता सुरक्षा टिकवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असुन नागरिकांसह पत्रकारांनी पोलीसांना सहकार्य करावे असे त्यांनी यावेळी सांगीतले. तळा प्रेस क्लब कडुन सन्मानित करण्यात आल्या बद्दल त्यांनी आभार मानले. तालुक्यातील घडणाऱ्या घडामोडीं बाबत सकारात्मक सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन पत्रकारांनी देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कोरोना विषाणूचा पार्श्वभूमीवर क्रांतिकारी सेवा संघाची दहीहंडी रद्द

### अध्यक्ष नामदेवशेठ फडके यांचा निर्णय

**दै.रायगड नगरी । पनवेल**



सध्या कोरोना विषाणूने भारतात धुमाकूळ घातलेला आहे. या पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट रोजी होणारा दहीहंडी उत्सव क्रांतिकारी सेवा संघाने रद्द केला असल्याची माहिती अध्यक्ष नामदेव शेठ फडके आणि नरेन्द्र भोपी– रायगड जिल्हा प्रवक्ता यांनी दिली आहे.

क्रांतिकारी सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या वतीने दरवर्षी नवीन पनवेलमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरा केला जातो. या दहीहंडी उत्सवात अनेक गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तूंचे वाटप करून त्यांचा गुणगौरव केला जातो. तसेच त्यांना रोख रक्कम देऊन त्यांचा गौरव केला जातो. क्रांतिकारी सेवा संघातर्फे माळीन येथे आलेल्या पूरग्रस्तांसाठी रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आली होती. तर महाराष्ट्रात आलेल्या भूषण पुरात झालेल्या नुकसानातील पूरग्रस्तांना ५० हजार रुपयांची रोख मदत क्रांतिकारी सेवा संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष नामदेवशेठ फडके यांच्यातर्फे करण्यात आली होती.

कोणत्याही राजकीय पक्षाचे वलय नसताना केवळ निस्वार्थपणे नामदेव शेठ फडके अनेकांना मदत करत असतात. त्यामुळे त्यांना जवळपास १०० हून अधिक सामाजिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे. क्रांतिकारी सेवा संघातर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येत असलेल्या दहीहंडी उत्सवात जवळपास सात ते आठ लाखांची बक्षिसे ठेवण्यात येतात व गोविंदा पथकांना देखील यावेळी रोख रक्कम व सन्मानचिन्ह येते. या दहीहंडी ला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभते. मात्र कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ही दहीहंडी रद्द करण्याचा निर्णय क्रांतिकारी सेवा संघाने घेतलेला आहे. शासनाला मदत आणि सहकार्य करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आलेला असल्याचे नामदेव शेठ फडके यांनी सांगितले आहे.

> शासनाला सहकार्य करण्यासाठी हा दहीहंडी उत्सव रद्द करण्याचा मी निर्णय घेतलेला आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.
>
> **नामदेवशेठ फडके,**
> **क्रांतिकारी सेवा संघ, महाराष्ट्र राज्य**

## गणेश विसर्जन मार्गावर रेजगा टाकण्यासाठी नगरपरिषदेची टाळाटाळ

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

पावसाळा सुरू झाल्यानंतर काही दिवसातच श्रीवर्धन नगरपरिषदेकडून ज्या ठिकाणी कच्चे रस्ते आहेत अशा ठिकाणी रेजगा टाकण्यात येतो. यावर्षी मठाच्या स्मशानभूमीतील रस्त्यावरती फक्त खडी डांबर अंथरून ठेवण्यात आली आहे. त्याच्यावरती कार्पेट अद्याप देखील झालेले नाही.

सदरचे कार्पेट पावसाळा संपल्यानंतरच करण्यात येणार असले तरी ज्या ठिकाण पर्यंत डांबरी रस्ता केला आहे, त्याच्या पुढील भागांमध्ये रेजगा टाकणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शासकीय विश्रामगृहा जवळील समुद्रकिनाऱ्यावर देखील गणेश विसर्जन मार्गावरती दर वर्षी रेजगा टाकण्यात येतो. परंतु यावर्षी त्या ठिकाणी रेजगा न टाकण्यात आल्यामुळे चिखलाचे साम्राज्य पसरले आहे. शासकीय विश्रामगृहा जवळुन कच्च्या रस्त्याने मठाच्या स्मशानभूमीकडे जाण्यासाठी रस्ता आहे. या रस्त्यावर देखील दरवर्षी रेजगा टाकण्यात येतो. परंतु यावर्षी नगरपरिषदेने रेजगा टाकण्याकडे टाळाटाळ केल्याचे दिसून येत आहे. रेजगा खरेदीसाठी दोन लाख रुपये खर्च झाल्याची विश्वसनिय माहिती प्राप्त झाली आहे. मात्र फक्त दोन लाख रुपयाचा रेजगा श्रीवर्धन येथील मच्छी मार्केट मध्ये टाकून संपला कसा? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तरी गणपती पूर्वी नगरपरिषदेने गणेश विसर्जन मार्गावरती व श्रीवर्धन शासकीय विश्रामगृह जवळून मठाच्या स्मशानभूमी कडे जाणाऱ्या रस्त्यावर रेजगा टाकण्यात यावा अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसद्वारे सुचित करण्यात येत आहे की, श्री.महादेव सखाराम बेलोसे रा.नागशेत, ता.सुधागड, जि.रायगड यांचे मालकीची व ताबेकब्जातील, शेतजमीन मिळकती मौजे : नागशेत, ता.सुधागड, जि.रायगड येथील मिळकत आहे ती खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : नागशेत, ता.सुधागड, जि.रायगड**

| सर्व्हे नं. /गट क्रं. | हिस्सा नं. | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ४०६ | | २ | ००–८०–००<br>पो.ख. ००–४५–००<br>एकूण १–२५–०० | ०.२५ |

येणेप्रमाणे सदर मिळकतीचे वर्णन आहे.

१) मौजे : नागशेत, ता.सुधागड, जि.रायगड येथील सर्व्हे नं/भूमापन क्रं.४०६ क्षेत्र १–२५–०० (हे.आर.पॉ.) एवढी मिळकत आमच आमचे अशिल श्री.धनाजी पोशा पवार व कमलाकर विठ्ठल भालेकर दोन्ही रा.सुकापूर, ता.पनवेल, जि.रायगड यांनी कायम नोंदणीकृत फरोक्त खताने विकत घ्यावयाची ठरविली आहे. सदरहू मिळकत ही सातबारा सदरी असलेल्या व्यक्तीच्या नावे असून सदर व्यक्तीचा सदरहू मिळकतीत हक्क व अधिकार आहे. तरीही सदरहू मिळकती संदर्भात कोणासही हरकत असेल अथवा अन्य कोणी सदरहू मिळकती संदर्भात हितसंबंधी असल्यास सदरहू हरकत अथवा लेखी पुरावा आमचे अशिलांना सदरहू नोटीस मिळाल्यापासून १४ दिवसांच्या आत खालील पत्यावर हरकत नोंदवावी. सदरहू हरकत विहित मुदतीनंतर घेतल्यास त्या हरकतींचा विचार आमचे अशिलांवर कायद्याने बंधनकारक राहणार नाही.

**सही/–**
**ॲड.दिनेश डी.पाटील**
**जय नारायण बिल्डींग, राम गणेश गडकरी पथ, शॉप नं.४, गावदेवी मंदिराजवळ, पनवेल–४१०२०६**
**मो.नं.८८७९८९७०६९**



श्री.भाकरे साहेब कोर्ट

अर्जदारातर्फे वकील : ॲड.सौ.अनिघा अ. कानिटकर

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.१००७/२०२१
नि.नं.९/ड
ने.ता.०६/१०/२०२१

श्रीमती.गिरिजा चंद्रमोहन गोडबोले
पुर्वाश्रमीची सुजाता अशोक नगरकर — अर्जदार

विरुद्ध

श्रीमती.पुष्पलता प्रभाकर गोडबोले वगैरे ३ — सामनेवाले

सर्व लोकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी प्रस्तुतचे अर्जातील अर्जदार श्रीमती.गिरिजा चंद्रमोहन गोडबोले पुर्वाश्रमीची सुजाता अशोक नगरकर यांनी भारतीय वारसा अधिनियम १९२५ चे कलम ३७२ अन्वये वारस दाखला मिळण्यासाठी दि.चौ.अर्ज क्र.१००७/२०२१ दाखल केला आहे. सदरहू आर्जमध्ये अर्जदार यांचे पती कै.चंद्रमोहन प्रभाकर गोडबोले हे दि.१९ मे २०२१ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल पनवेल येथे मयत झाले आहेत.

कै.चंद्रमोहन प्रभाकर गोडबोले यांची स्वकष्टार्जित स्थावर मिळकत असून सदर मिळकत त्यांनी दि.२५ नोव्हेंबर १९९७ रोजीच्या खरेदीखताने (दस्त क्र.२४६०/१९९७) विकत घेतली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकत पुढीलप्रमाणे**

| अ.क्र. | तपशिल | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १ | फ्लॅट नं.२०२, (जुना ६) दुसरा मजला, बागेश्री को.हौ.सो., नित्यानंद मार्ग, गोखले हॉल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र ४१०२०६ | ५१० स्क्वे. फुट |

उपरोक्त स्थावर मिळकत अर्जदारांच्या नावे होणेकरिता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अर्जदारास वारस दाखला देण्याबाबत संबंधित नातेवाईक, हितसंबंधित किंवा अन्य कोणाची काही हरकत असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आमच्याकडे नमूद पत्यावर पुराव्याचे सर्व कागदपत्रासहीत येवून आमची खात्री करून द्यावी. अन्यथा या अर्जाची चौकशी करून अर्जदार यांना योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी असे जाहीर करण्यात येत आहे.

जाहीर नोटीस आज दि.२३/०८/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली आहे.

**सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**



गोडसे मॅडम

ॲड.संगम प्रकाश सावंत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो.(क) स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१०८२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२९/०९/२०२१

१) श्री.दिनेश शंकर कांबळे
वय : ३१ वर्षे, धंदा : नोकरी
२) श्रीमती.पार्वती शंकर कांबळे
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्री.स्वप्नाली शंकर कांबळे
वय : २६ वर्षे, धंदा : नोकरी
४) सौ.पुनम मंगेश आवले
वय : ३४ वर्षे, धंदा : नोकरी
रा.शांतीकुंज को.ऑ.हौ.सो.लि.,
रुम नं.सी २०२, प्लॉट नं.१४ डी,
खारघर, नवी मुंबई ४१०२१० — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्रं.१ यांचा मुलगा व अर्जदार क्रं.२ यांची पत्नी, अर्जदार क्रं.३ यांचा मुलगा, अर्जदार क्रं.४ यांचा मुलगा यांचे वडील कै.शंकर गेनबा कांबळे यांचा मृत्यू दि.२८/११/२००१ रोजी नायर रुग्णालय मुंबई येथे मृत्यू झाला आहे. त्यांचे मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकत**
**शांतीकुंज को.ऑ.हौ.सो.लि., रुम नं.ई ३०३, प्लॉट नं.१४ डी, खारघर, नवी मुंबई ४१०२१०**

येणेप्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुषंगाने वारस दाखला मिळणे करिता अर्जदार यांनी मे. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.शंकर गेनबा कांबळे यांचे वारस नाहीत असे अगर यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२८ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**



श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.राजेश रामा चौधरी
(अर्जदारांतर्फे वकील)

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो. (व.स्तर) यांचे कोर्टात

चौ.अर्ज क्र.८३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०९/२०२१

१) श्री.राकेश चंद्रकांत पवार
वय : ३७ वर्षे, धंदा : नोकरी — अर्जदार क्रं.१
२) श्री.सचिन चंद्रकांत पवार
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी — अर्जदार क्रं.२
३) सौ.शुभांगी चंद्रकांत पवार
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.सदनिका क्रं.सी–४०१,
इंद्रधाम कॉम्प्लेक्स सी.एच.एस.,
प्लॉट नं.६७, सेक्टर नं.६ ए,
कामोठे नवी मुंबई ४१०२०६ — अर्जदार क्रं.३

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील अर्जदार क्रं.१ व २ यांचे वडील व अर्जदार क्रं.३ यांचे पती कै.चंद्रकांत धोंडू पवार यांचा मृत्यू दि.१८/०२/२०१२ रोजी डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ येथे झाला आहे. अर्जदार क्रं.१ ते ३ हे यांचे कायदेशीर वारस आहेत.

**मिळकत क्रं.१**
**(मिळकतीचा ५० टक्के हिस्सा)**
**१) सदनिका क्रं.सी ४०१, चौथा मजला, इंद्रधाम कॉम्प्लेक्स सी.एच. एस., प्लॉट नं.६७, सेक्टर ६ ए, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम ५,००,०००/–)**

**मिळकत क्रं.२**
**(मिळकतीचा ५० टक्के हिस्सा)**
**२) गाळा नं.०९, तळमजला, साई प्लाजा सी.एच.एस., प्लॉट नं.०४, सेक्टर ०७, कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड ४१०२०६ (सदर मिळकतीचे बाजार मुल्य रक्कम ५,००,०००/–)**

येणेप्रमाणे सदनिका ही मिळकतीचे वर्णन असून सदरहू सदनिकेचे अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै.चंद्रकांत धोंडू पवार यांचे वारस नाहीत असे अगर यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७ माहे ०८ सन २०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## दिवंगत लोकनेते ॲड.दत्ता पाटील यांची पुण्यतिथी साजरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोकण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष तथा विधान सभेचे माजी विरोधी पक्ष नेते लोकनेते दत्ता पाटील यांची दहावी पुण्यतिथी को. ए. सो. चे विठोबा खंडाप्पा हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयात, पनवेल येथे शाळा समितीचे सभापती आमदार बाळाराम पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी करण्यात आली.



महाराष्ट्र विधानसभेचे विरोधी पक्ष नेते आणि कोकण एज्युकेशन सोसायटीचे माजी अध्यक्ष दत्ता पाटील हे कोकणातील सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाचे मानबिंदू होते. असे मत बाळाराम पाटील यांनी व्यक्त केले तर

लोकनेते दत्ता पाटील हे शैक्षणिक क्षेत्रातील अतुलनीय व्यक्तीमत्व असून त्यांनी रायगड, ठाणे आणि सिधुदुर्ग जिल्ह्यातील गोरगरिबांसाठी शिक्षणाची दालने खुली करून दिल्याने लाखो विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ घेता आला. लोकसभेचे माजी अध्यक्ष आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी हे ही व्ही .के .हायस्कूल चे विद्यार्थी असल्याचा उल्लेख प्रितम म्हात्रे यांनी केला.

दादांना जाऊन दशकपुर्ती झाली पण ते अद्याप आपल्यातच आहे असे वेळोवेळी जाणवते. मरावे परी किर्ती रूपे उरावे या उक्ती प्रमाणे दादांचे अस्तित्व प्रत्येक ठिकाणी जाणवते.असे शाळेचे मुख्याध्यापक प्रमोद ठाकूर यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.

दिवंगत लोकनेते दत्ता पाटील यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी शाळा समिती सभापती तथा शिक्षक आमदार बाळाराम पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, शे का प चिटणीस गणेश कडू, मंगेश अपराज, बबन विश्वकर्मा, मुख्याध्यापक प्रमोद ठाकूर व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# माथेरानमधील वेगवेगळ्या समस्या निश्चितपणे मार्गी लावू : आ. प्रशांत ठाकूर

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान या छोट्याशा गावात आजही अनेक समस्या तशाच प्रलंबित आहेत. सर्वसामान्य लोकांना त्याचप्रमाणे पर्यटकांना भेडसावत असलेल्या वेगवेगळ्या समस्या निश्चितपणे मार्गी लावण्यासाठी भाजप प्रयत्नशील आहे असे मत पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केले आहे.

भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून मोफत नेत्रचिकित्सा आणि चष्मे वाटप त्याचबरोबर आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रशांत ठाकूर बोलत होते. एका हॉटेलमध्ये आयोजित केलेल्या या छोटेखानी कार्यक्रमात व्यासपीठावर प्रशांत ठाकूर (आमदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष रायगड), मंगेश म्हसकर (कर्जत तालुका मंडल



अध्यक्ष तथा सदस्य नेरळ ग्रामपंचायत ) व किरण ठाकरे (उद्योजक कर्जत), माथेरान नगरपालिका उपनगराध्यक्ष आकाश चौधरी आदी उपस्थित होते.

माथेरान मधील अनधिकृत झोपडपट्टी कशाप्रकारे लवकरात लवकर अधिकृत करता येईल त्याचप्रमाणे पर्यटकांना स्वस्त आणि सुखकर प्रवासासाठी इलेक्ट्रिक वेहीकल्स असुद्या, तरूण रोजगारासाठी व्हॅली क्रॉसिंग, रेल्वेच्या मालवाहतूक सेवेबाबत आणि अन्य वेगवेगळ्या प्रकारच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नात आहोत. विशेष म्हणजे राजकीय भिंती बाजूला ठेवून भाजपने आयोजित केलेल्या या कार्यक्रमास काँग्रेसचे अध्यक्ष मनोज खेडकर, काँग्रेसचे नगरसेवक शिवाजी शिंदे तसेच मनसे अध्यक्ष संतोष कदम यांनी उपस्थिती लावल्याबद्दल त्यांचेही ठाकूर यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

या वेळी अनेकांनी मोफत शिबिराचा लाभ घेतला. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विलास पाटील (अध्यक्ष), शैलेंद्र दळवी (उपाध्यक्ष), सुभाष भोसले (उपाध्यक्ष), संपत दरेकर सर (सचिव), संजय भोसले (सचिव), संध्या शेलार (महिला अध्यक्षा), बाबू बर्गे (अध्यक्ष युवा मोर्चा) तसेच भाजपचे सर्व नगरसेवक/नगरसेविका, आजी, माजी पदाधिकारी, युवा मोर्चा, आणि महिला आघाडी उपस्थित होते.

# बनावट नावाने व कागदपत्रांच्या सहाय्याने न्यायालयाची फसवणूक करणाऱ्या जामिनदाराला अटक

## न्यायालयात बोगस जामिनदारांच्या माध्यमातून जामिन मिळवून देणारी टोळी पुन्हा सक्रिय

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सीबीडी बेलापुर येथील न्यायलयात बनावट नावाने व बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने आरोपीला जामीन देण्याच्या प्रयत्नात असलेल्या व्यक्तीला न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी पकडून सीबीडी पोलिसांच्या स्वाधीन केल्याची घटना उघडकिस आली आहे. इकबाल इस्माईल पटेल (४७) असे या व्यक्तीचे नाव असून सीबीडी पोलिसांनी त्याच्यावर फसवणुकिसह, बनावटगीरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

दरम्यान, या आरोपीने यापुर्वी देखील खोटया नावाने एका आरोपीला जामिन देऊन न्यायालयाची फसवणुक केल्याचे उघडकिस आले आहे. त्यामुळे सीबीडी येथील न्यायालयात बोगस जामीनदार आणि बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून आरोपींना जामिन मिळवून देणारी टोळी पुन्हा सक्रिय झाल्याची चर्चा न्यायालयीन वर्तुळात आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेला बोगस जामिनदार इकबाल इस्माईल पटेल हा गत गुरुवारी एपीएमसी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या एका गुह्यातील आरोपी तौहीत निसारउद्दीन खान याला जामीन देण्यासाठी सीबीडी येथील न्यायालयात गेला होता. यावेळी बोगस जामिनदार इकबाल इस्माईल पटेल याने दानिश इरफान खान (४७) हे बोगस नाव धारण करुन त्या नावाने तयार करण्यात आलेले बनावट आधारकार्ड, रेशन कार्ड, वसई महापालिकेची घर टॅक्स पावती, ॲफिडेव्हीट सोबत घेतले होते. यावेळी वकिल आर.के. सोनार यांनी बोगस जामिनदार इकबाल पटेल याची कागदपत्रे व ॲफिडेविट न्यायालयातील वरिष्ठ लिपिक यांच्याकडून पडताळणी करुन घेतल्यानंतर त्याला न्या. कोळपकर यांच्या न्यायालयात जामिनासाठी हजर करण्यात आले होते.

यावेळी न्या. कोळपकर यांना सदर जामिनदाराला यापुर्वी पाहिल्याचा संशय आल्याने त्यांनी कनिष्ठ लिपीकांना जामिनदारांचे रजिस्टर तपासण्यास सांगितले होते. त्यानंतर न्यायाधीशांनी आरोपीला जामीन देखील दिला होता. मात्र, न्यायालयातील सह शिरस्तेदाराला रजिस्टर तपासताना बोगस जामिनदार इकबाल पटेल याचा फोटो निदर्शनास आला. तसेच त्याने यापुर्वी त्याच न्यायालयात इकबाल पटेल या नावाने एपीएमसी पोलीस ठाण्यातील आरोपी सम्राट पात्रो याला जामिन दिल्याचे आढळून आले. याबाबतची माहिती न्यायाधीशांना देण्यात आल्यानंतर न्या. कोळपकर यांनी आरोपीला जेलमधुन मुक्त करण्याचा देण्यात आलेला मेमो न्यायालयात जमा करण्यास वकिलाला सांगितले. तसेच न्या. कोळपकर यांनी सदर बोगस जामिनदारावर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानंतर बोगस जामिनदार इकबाल पटेल याला सीबीडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आल्यानंतर पोलिसांनी त्याची चौकशी केली असता, त्याचे खरे नाव इकबाल पटेल असल्याचे व तो नालासोपारा पुर्व येथील आनंदपार्क बिल्डींगमध्ये राहात असल्याचे आढळुन आले. इकबाल पटेल याने न्यायालयात बनावट कागदपत्र सादर करुन न्यायालयाची फसवणुक केल्याचे आढळून आल्याने सीबीडी पोलिसांनी त्याच्यावर फसवणुकिसह बनावटगीरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

गत मार्च महिन्यात मलंग मोहम्मद शेख या व्यक्तीने बनावट नाव व बनावट कागपत्रांद्वारे आरोपीला जमीन देण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी न्यायाधीशांनी संशयावरुन त्याची कागदपत्रे तपासून त्याला सीबीडी पोलिसांच्या ताब्यात दिले होते. त्यानंतर सदर आरोपीने ४ ते ५ आरोपींना जामीन दिल्याचे उघडकीस आले होते. त्यानंतर गत जुन महिन्यामध्ये भावेश राकेश म्हात्रे (२७) याने न्यायालयात बनावट कागदपत्रांच्या सहाय्याने बांग्लादेशी महिला आरोपीला जामीन देण्याचा प्रयत्न केला होता.

# ग्रीनलँड कंपनीच्या स्टॉक रुमला भीषण आग

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील भार्जे ग्रामपंचायत हद्दीतील आंबिवली भार्जेवाडी गावाजवळ असलेल्या ग्रीनलँड कंपनीच्या स्टॉक रुमला शुक्रवारी सायंकाळी उशिरा भीषण आग लागली होती.

या आगीच्या ज्वाळा आसमंतात भडकत होत्या, मोठ्या प्रमाणात धूर व आगीचे लोळ पाहुन सभोवतालचे नागरिक भयभीत झाले होते. या आगीत लाखो रुपयांचे सामान जळून खाक झाले आहे. मात्र सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही आग शॉकसर्किटमुळे लागली असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ग्रामस्थांच्या मदतीने रात्री आग विजवण्यात यश आले आहे.

# फिल्म प्रोड्युसरची ऑनलाईन फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एकाच फिल्म प्रोड्युसरची ऑनलाईन फसवणूक झाल्याची घटना कामोठे वसाहत परिसरात घडली आहे. कामोठे परिसरातील सेक्टर ३६ येथे राहणारे आदित्य सिंह या फिल्म प्रोड्युसरला ऑनलाईन कंपनीच्या नावाने वेगवेगळ्या ॲपच्या माध्यमातून सुमारे १ लाख ३५ हजाराची फसवणूक करण्यात आली आहे. आपली फसवणूक झाल्याचे समजताच या संदर्भात त्यांनी कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

# पाली नगरपंचायत हद्दीतील सार्वजनिक शौचालयांची दुरवस्था

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

सुधागड तालुक्यातील अष्टविनायक क्षेत्रापैकी पाली नगरपंचायतीच्या हद्दीतील शौचालयांची दुरवस्था झाली आहे. तसेच पाली ही सुधागड तालुक्याची महत्त्वाची बाजारपेठ असल्याने आजुबाजुच्या खेड्यापाड्यातील लोक खरेदीसाठी पालीत येत असतात. पालीतील शौचायलाची अवस्था पाहुन येणाऱ्या लोकांची ही गैरसोय होत असल्याचे ही बोलले जात आहे. पाली नगरपंचायत हद्दीतील अनेक शौचालय हे ना दुरुस्त आहेत. तर काही शौचालयाची आतून कड्या तुटलेल्या, बाजूचा सर्व परिसर घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

अनेकवर्षांपासून पाली नगरपंचायतीने याकडे दुर्लक्ष केल्याने परिसरातील ग्रामस्थ पाली ग्रामपंचायतीच्या कारभाराबद्दल संताप व्यक्त करीत आहेत. आगर आली येथील काही वर्षांपूर्वी सार्वजनिक शौचालये बांधण्यात आली. शौचालयाच्या दरवाजे नाहीत. संडासांची आवस्था ही दैनी झालेली आहे. शौचालयाच्या परिसरामध्ये ठिकठिकाणी प्रचंड कचरा साठलेला आहे.या घाणीमुळे आणि दुर्गंधीमुळे परिसरातील लोकांच्या



आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाली नगरपंचायत हद्दीतील सर्व सार्वजनिक शौचालय लवकरात लवकर दुरुस्त करावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

पाली ग्रामपंचायत हद्दीतील आगरआली आणि इतर हद्दीमध्ये सार्वजनिक शौचालय आहे. व ती नादुरुस्त आहेत. याच्यामुळे येथे राहणाऱ्या रहिवाशांना व महिलांना जास्त त्रास होतो. त्या परिसरात दुर्गंधी पसरत आहे. आम्ही पाली नगरपंचायतींमध्ये या विषयावर अनेक वेळा तक्रारी करून सुद्धा दखल घेतली जात नाही.

**प्रकाश पालकर उपाध्यक्ष (सुधागड वंचित सामाजिक विकास संस्था)**

# रोहा वनविभागाच्या कारवाईत खैर लाकडाची चोरी पकडली

**दै.रायगड नगरी । धाटाव**

मुंबई गोवा महामार्गावर मोरया धाब्याजवळ खैर लाकडाची चोरी पकडण्यात आली आहे.अंदाजे सहा लाख रुपये किमतीची ही लाकडे असल्याचे समजते.

उपवनसंरक्षक रोहा अप्पासाहेब निकत व सहाय्यक वनसंरक्षक रोहा विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनखाली हि धडक कारवाई करण्यात आली. मिळालेल्या गुप्त माहिती वरून वनक्षेत्रपाल संरक्षण व अतिक्रमण निर्मूलन रोहा कांबळी, वनरक्षक फिरते पथक रोहा अजिंक्य कदम, वनरक्षक शेणवई तेजस नरे, वनरक्षक मेढा, योगेश देशमुख वनरक्षक कुशेडे, किशोर वाघमारे, वनपाल माणगाव, गायकवाड व राऊंड स्टाफ माणगाव यांनी मौजे विघवली फाटा मुंबई गोवा महामार्गावर मोरया धाब्याजवळ टाटा ट्रक क्रमांक.एम एच १६ क्यू.७१५१ तपासले असता त्यामध्ये अवैध वृक्ष तोडीचा विनापरवाना वाहतूक केलेलं खैर सोलिव मालं ९.२२५ घमी किंमत १५,५३०/- व ट्रक अंदाजे किंमत रुपये पाच लाख मात्र, एकूण ५,१५,५३०/- इतका मुद्देमाल व आरोपी उमेश जयसिंग ढवळे रा.बारामती वडगाव निंबाळकर सह जप्त केला.

त्याचप्रमाणे आजूबाजूला तपास केला असता मौजे कशेणे गावाजवळ मुंबई गोवा महामार्गावर टाटा एस क्रमांक. एम.एच.०६.बी.जी. ००८९ मागील ताडपत्री उघडून तपासले असता सदर टेम्पो मध्ये खैर सोलीव नग १३ घमीं ०.२३७ किंमत ३३७४- रुपये इतका व टेम्पो किंमत ६०,०००/- असे एकूण ६३,३७४/- इतका मुद्देमाल बेवारस जमा करण्यात आला. मात्र अद्याप पुढील तपास चालू आहे. रोहा वनविभागाच्या ह्या धडक कारवाई बद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



# बनावट इन्स्ट्राग्राम अकाऊंटद्वारे महाविद्यालयीन तरुणीचे मॉर्फ केलेले फोटो व्हिडीओ केले व्हायरल

## अज्ञात व्यक्तीचा पोलिसाकडून शोध सुरु

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली परिसरात राहणाऱ्या एका १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीचा मोबाईल नंबर व फोटोचा वापर करुन तीच्या नावाने बनावट इन्स्ट्राग्राम अकाऊंट तयार करुन त्यावर मॉर्फ केलेले तरुणीचे अश्लिल फोटो, व्हिडीओ तसेच अश्लिल मेसेज टाकुन सदर तरुणीची बदनामी केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. कळंबोली पोलिसांनी या प्रकरणातील अज्ञात व्यक्ती विरोधात आयटी ॲक्टसह बदनामीकारक माहिती प्रसिद्ध केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील १७ वर्षीय महाविद्यालयीन तरुणी कळंबोलीत रहाण्यास असून सध्या ती शिक्षण घेत आहे. या तरुणीने वर्षभरापुर्वी आपल्या नावाने इन्स्ट्राग्रामचे अकाऊंट सुरु केले होते. गत मार्च महिन्यामध्ये या तरुणीला एका अज्ञात व्यक्तीने रिक्वेस्ट पाठवली होती.

त्यावर सदर तरुणीने क्लिक केल्यानंतर त्यात सदर तरुणीच्या नावाने बनावट इन्स्ट्राग्राम अकाऊंट तयार करण्यात आल्याचे तसेच सदर अकाऊंटवर तरुणीचा मोबाईल क्रमांकाचा वापर करण्यात आल्याचे आढळुन आले. त्याचप्रमाणे सदर तरुणीच्या फक्त चेहऱ्याचा वापर करुन मॉर्फ केलेले तरुणीचे अश्लिल फोटो व व्हिडीओ टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले.

सदर फोटो व व्हिडिओ सोबत अश्लील मजकुर टाकण्यात आल्याचे तरुणीच्या निदर्शनास आले. विशेष म्हणजे मॉर्फ केलेले फोटो, व्हिडीओ व मेसेज सदर तरुणीच्या खऱ्या इन्स्ट्राग्राम अकाऊंटमधील १०६ मित्र मैत्रिणींना पाठवण्यात आल्याचे देखील या तरुणीच्या लक्षात आले. बदनामी करण्याच्या उद्देशानेच अज्ञात व्यक्तीने हा प्रकार केल्याचे तरुणीच्या लक्षात आल्यानंतर तरुणीने सदर प्रकाराची माहिती आपल्या आई-वडिलांना दिली. त्यानंतर तरुणीच्या वडिलांना याबाबतची लेखी पार कळंबोली पोलिसांकडे केली होती. त्यानुसार पोलिसांनी या प्रकरणाचा प्राथमिक तपास करुन अज्ञात व्यक्ती विरोधात आयटी ॲक्टसह बदनामीकारक माहिती प्रसिद्ध केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

## संपूर्ण भारत देशामधील ७५ व्या सि.एन.जी सेंटरचा मान प्रथम रायगडला

# कशेणे येथे सि.एन.जी लक्ष्मण फ्युएल सेंटरचे उदघाटन



**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव तालुक्यातील कशेणे या ठिकाणी मुंबई -गोवा हायवे लगत या फ्युएल सेंटरचे उदघाटन करण्यात आले. भारत पेट्रोलियम अंतर्गत सदरचे सेंटर उभारण्यात आले आहे. भारताचा ७५ वा अमृत महोत्सव या निमित्त देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशामध्ये ७५ सिएनजी सेंटर उभारण्याचे जाहीर केले होते. त्या मधील रायगड जिल्हामध्ये माणगांव तालुक्यात कशेणे गाव येथे मुंबई - गोवा हायवे लगत एक सिएनजी सेंटर उभारण्यात आले आहे.

या सेंटर चे पनवेल येथील मालक तसेच नामवंत उद्योजक लक्ष्मणजी पाटील यांनी कशेने येथील हायवे लगत हे सेंटर उभारले असून या सेंटर च्या उदघाटन प्रसंगी रमण मलिक, अचमन ट्रेंटन, अनुप तनेजा, रमेश मिनी,उमेश कुलकर्णी प्रमुख पाहुणे उपस्थित होते. या वेळी मालक लक्ष्मण पाटील, प्रविण पाटील, अस्मित पाटील, तळाशेत इंदापुरचे माजी उप सरपंच अजित भोनकर,सदस्य संतोष मुढे, युवा उद्योजक उदय डाळ, रंजित मालोरे तसेच अनेक डीलर तसेच ग्राहक बहुसंख्येने उपस्थित होते. पेट्रोल पंप आणि सिएनजी हे एकत्रच असून व अनेक सुविधा उपलब्ध असल्याने या सेंटर चा उपयोग अनेक वाहन धारक यांना होणार असून पनवेल ते खेड पर्यंत गॅस सेंटर नव्हते त्यामुळे अनेक वाहन धारकांना या सेंटर चा मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे.

मुंबई - गोवा हायवेवर पनवेल ते खेड पर्यत एकही सिएनजी गॅस सेंटर नव्हते.

सिएनजी वाहन चालक यांना रोहा आणि पनवेल , नेरुळ या ठिकाणी गॅस भरण्यास जावे लागत होते. परंतु आता माणगांव तालुक्यात इदापुर कशेने गाव हायवे लगत सिएनजी सेंटर उपलब्ध झाल्यामुळे पोलादपुर, महाड, श्रीवर्धन, म्हसळा, तळा, तालुक्यातील तसेच लोणेरे, गोरेगाव, इंदापुर, निजामपुर, या विभागातील ग्राहक यांच्यामध्ये मोठे आनंदाचे वातावरण आहे.